# स्तवन

गणाधिशा व गणनायका
मी तुज चरणी वाहीली
घन गर्भातुन प्रतिभेच्या
*'अक्षरशिल्पे'* अवतरली

# प्रतिभा

निर्घोष नाद किनरी गगनी घुमू दे
व्यावर्तनी मज मनी कविता फुलू दे
काव्यात ओतलि रसे शतदा कशाची
प्रेमात मीच बनलो प्रतिभा मनाची

# आई कृपा असावी

आई कृपा असावी माया तुझी लेकरांवर
जाईल तुझ्या कृपेने सूर्य चंद्र मंगळावर

*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*

प्रत्येक शब्द तुझा देतसे भारी धीर मजला
मार्गामध्ये अडसर होण्या समर्थ कोण धजला

कळांतर मातृ प्रेमाचे काय जगतामधी फिटे
सुवर्ण रत्न व मौक्तिके सर्व पडते येथे थिटे

# आम्ही हसरे तारे

आम्ही हसरे तारे । आई तुझिया बागेत सुंदर ।
चमकुनी झळाळते । प्रकाशते तू छायेत भर्जर ।।

ता-यांची तूच असे । सावली तूच आहे माऊली ।
तुझीगे मूर्ती वसे । बनून ईश्वर यांच्या राऊळी ।।

*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*

आई ऐकतेस ना । तुझिया कन्हैयाची ही आर्या ।
हिमालय झाल्यावरी । आणिन सेवे सुन माझी भार्या ।।

# सुभाष

उन्मत्त वादळ नि वारा । डोले निस्तब्ध निवारा ।
व्योम वर्षतो अंगारा । जळी थळी रास करारा । ।धृ। ।

*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*

।

महामानव धिरोदत्तं । खेळे बनून निर्धास्त ।
देवतांचा वरदहस्त । जनांचा सुभाष सहारा । ।२। ।

लढेन पडेन मी समरी । झुंजत राहील भूवरी ।
श्वास चालतील जोवरी । शत्रूस आता ना थारा । ।३। ।

*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*

जयघोष निनादे आता । फडकेल तिरंगा आता ।
पूर्ती स्वप्नांची आता । होईल मुक्त आज धरा । ।५। ।

आशा एकही असे उरी । नांदावे स्वातंत्र्य घरी ।
भोगण्यास मी नसे जरी । येई भावार्थ रूधिरा । ।५। ।

# गंध मराठी मातीचा

गंध मराठी मातीचा
एकदा घेऊन तरी पहा
गंध ललाटी भाग्याचा
एकदा लावुन तरी पहा

रणफंदीची ही भूमी
गोरगरीबांची आई
जात पंथ ही कितीतरी
उदरात ठेवुनी घेई

सहयगिरीच्या मनातुनी
प्रेमांकुर वाहत जाती

*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*

या मातीतुन वीर उठे
निर्भिड छाती घेवुनिया
ना झुके कधी वीर लढे
मस्तक धरेस वाहुनिया

या मातीवर किती किती
या जन्मी प्रेम करावे

*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*

# हे जीवन माझे

हे जीवन माझे,दळभद्री। मी लाजे म्हणता, हे सदरी।।धृ।।
आशा आणिक, कुठे निराशा
दोन घटीका, हाच तमाशा
सजूनि बैसे,नित ही अवरी। हे जीवन माझे,दळभद्री।।१।।

गूढ तमाच्या, अधरातूनी
तम हे उफळे, माझ्या भवनी
बोचतात काटे कितीतरी। हे जीवन माझे,दळभद्री।।१।।

*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*

नित्यच फल हे, माझ्या पदरी। हे जीवन माझे,दळभद्री।।१।।

सरिते ये ये, सिंधू ये ये
झिजवित सर्व दिशांना तू ये
घेवूनी चल मला किनारी। हे जीवन माझे,दळभद्री।।१।।

# वंशज

क्षितीजाच्या पलीकडे ती चूटपूट लावणारी जागा
मिणमिणत्या प्रकाशी जगती जीवनाचा असुनी त्रागा

विश्व पहुडून आहे निवांत तममयी कारागृहात
कोरडी घने फिरती उगीच काहुर करती गगनात

*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*

भुखेने व्याकूळ जीवाचे नेत्र बघितले भिजलेले
आणिक पाहीले मी स्तनातील दुग्धरसा थिजलेले

व्योम वर्षेल धारा आस लावूनी लोचनी ही धरा
श्वास घेती श्वास सोडती जगण्यासाठी हा पसारा

*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*

रडत होता व्याकूळ वंशज अधिकारी तो आर्यांचा
काळवंडला तो पिवुनी प्रकाश लक्ष लक्ष सूर्यांचा

# दोन दिसांचे

दोन दिसांचे हे जगणे
दोन दिसांनी अन् मरणे
खेळ अनोखा
हा दैवाचा
कुणा न टळणे
उगीव मग ऊर बडवणे

जीवन म्हणजे एक शशिनी
अश्रूंची सामुद्रधुनी
*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*
कुणा न वळणे
सायक ना मागे फिरणे

गाणारे असति शहाणे
गावे नित जीवन गाणे
कधी हसावे
*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*
सार्थ करावे हे जगणे

जीवन अपुले सार्थ करा
प्रेम दया वा
सत्य अहिंसा

*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*

# ध्रुवतारा

कोण टाकेल मज कारा । मी अडिग असा ध्रुवतारा
चंद्र विकासी
नीरज वासी
उत्तरेकडे अनुसारा । मी अडिग असा ध्रुवतारा

ढळतील दिशा
निजतील उषा
गुंडगाळि सर्व पसारा । मी अडिग असा ध्रुवतारा

*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*

तुज तेजाने तमोहरा । मी अडिग असा ध्रुवतारा

मज पाहे तो
भाग्यवान हो
सर्वांची ही अवधारा । मी अडिग असा ध्रुवतारा

निश्चल...स्थिरं
अविचल धीरं
मी अवकाशी कलदारा । मी अडिग असा ध्रुवतारा

# दिवाळी

घरात आली आज दिवाळी, घेऊनी हसरे तारे
या ता-यांसह हसते फिरते, मनात माझ्या वारे

आतषबाजी व रोषणाईने, नटली आज धरा
सुवर्णरत्नांनी मौक्तिकांनीही, बघ सजली आज धरा

मनामनातूनि चंद्राचे रूप प्रतिबिंबित झाले
आसमंतातील तारे उतरूनी धरतीवर आले

पाहूनी खाऊंच्या राशी जिभल्या कुणी चाटे
मेवा मिठायांनी भरून गेली गच्च ही कपाटे

नवीन सदरा नवीन चड्डी सगळे झाले न्यारे
नव्यानव्याने सजून आले बाजारतळही सारे

*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*

पप्पा म्हणती आज निघाले दिवाळे जरीही
तरी तुझ्या गालावरती खुलली नवी चंद्रकळीच खरी

पिवळे पातळ नेसून घरात आली लक्ष्मी आई
भाऊरायाला प्रेमाने ओवाळती घरोघरी ताई

आजोबा देऊनी पिळ मिशीला म्हणती या रे या
युगानंतरही गाली गोड तुम्ही एकच पापा द्या

आज दिवाळी घेऊनी आली जवळची सर्वांना
हसवुनी रडवुनी हर्ष देऊनी गेली आज मनांना

# मी आहे दीप उदयाचा

कमलदानातली शाही । आशेने मजला पाही
अविलंब इषु विचारांचा । मी आहे दीप उदयाचा

बीयांची रास दुतर्फी । धरणी घेवूनी गर्भी
मी वंकनाळ गर्भाचा । मी आहे दीप उदयाचा

*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*

चिलखत भूवर सोनेरी । पीतवर्णी हिरवे जरी
मी चंडकिरण जन्माचा । मी आहे दीप उदयाचा

उत्तुंग हिमाचा माथा । अनागत जलाचा साठा
मी अंत्यज गात्र तयांचा । मी आहे दीप उदयाचा

*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*

# दिनकर

पुर्वनभी दिनकर भोळा
तो तर गगनाचा डोळा
वा तप्त लोहसा गोळा
ना दिसे तासिका सोळा

तू दिनकर जीवनदाता
तू जीव-जंतुचा भ्राता
तू जन्माची दिठी साता
भेकट परि रजनी होता

दिनकर उगवी हा दिवसा
दिघत पोहचे तो दिघडा
दिवाब्धा तयाचे दिधणे
दिपुष्ठात चंद्रहि दिसणे

चंड किरणात धरतीने
सोनेरी पंख लावले
क्षणार्धात विश्वही सारे
ढंकाळाने उजळविले

मारली बुडी धीटपणे
तू भास्कर मरण्यासाठी
यामिनी योनि-नी तजले
तुज पुनःश्च जगण्यासाठी

# बाला

बाला आणिक एक आली । मी वाजवली करटाळी
जाणिले असे ती अवरी । कमनीय देह दिसे तरी

शांत बुध्द ती अवधारा
योगिनीसमे ध्रुवतारा

कलभंत नसे एकली बसे । मजला वाटे बोलु कसे

*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*

उघडमाथेच लढायचे । ठरवले काय वदायचे

काय पडलेय तळखंडी
मी सावरली मज बंडी

नेत्रकटाक्ष तिचा वळला । मी म्हटले 'पोपट  झाला'

चंद्रकळी गाली स्फुरली
सुहास्यवदने ती वदली

पोपट तुझाच रे झाला । माझी तर मैना झाली
मुकी न ती साक्षच पटली । मी वाजवली करटाळी

# बहुराणी

करांचे पंख झाले असते
तर नभात मी शिरलो असतो
वा-यासंगे
या आकाशी
दाही दिशांत फिरलो असतो

*Some lines are unavailable*

*Some lines are unavailable*

मग हे जीवन नसते माझे
पिंज-यातील दमछाकीचे
अडल्या नडल्या
भातुकलीच्या
खेळामधल्या बहुराणीचे

# जीवन

जीवन म्हणजे;
दोन समांतर
रेषांमधली
एक छेदीका
अखेरी जिच्या;
असतात दोन
छेदनबिंदू
पहिला जीवन
आणिक असतो
दुसरा मृत्यू
यांच्याशिवाय
जीवनामधे
घडेल काही
याची देणे
कुणी शाश्वती
शक्यच नाही

## Thank You for previewing this eBook

You can read the full version of this eBook in different formats:

- HTML (Free /Available to everyone)
- PDF / TXT (Available to V.I.P. members. Free Standard members can access up to 5 PDF/TXT eBooks per month each month)
- Epub & Mobipocket (Exclusive to V.I.P. members)

To download this full book, simply select the format you desire below